# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## प्रभूचा बाप्तिस्मा

## १० जानेवारी २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. अखिल मानव जातीवरील परमेश्वराच्या प्रेमावर विश्वास ठेवून आपण आपल्या प्रार्थना त्याच्या चरणी अर्पण करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना येशूच्या बाप्तिस्माचे महत्व भाविकांना श्रद्धेने पटवून देण्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य ते निर्णय घ्यावेत तसेच आपले सर्व धार्मिक विधी पूर्ववत करण्यासाठी आपल्याला सहाय्य करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. बाप्तिस्मा साक्रामेंत ख्रिस्तसभेचे प्रवेशद्वार आहे. ह्या साक्रामेंताद्वारे पवित्र आत्म्याची दानं आणि फळं भाविकांना मिळत असतात. ह्या दानांचा योग्य तो वापर श्रद्धावंताना करता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. बाप्तिस्मा साक्रामेंतासाठी आणलेल्या बालकांची धर्म श्रद्धेत वाढ करण्याची जबाबदारी आईवडील व धर्म आईवडील स्वीकारत असतात. ही जबाबदारी योग्य रितीने पार पाडण्यास त्यांना ईश्वराची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर, विशेषकरून जे आजारी आहेत, परगावात, परदेशात आहेत, प्रवासात आहेत अशावर परमेश्वराचा आशीर्वाद असावा, कोरोना विषाणुपासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. आमच्या जीवनातील सर्व गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.